# अ‍ॅग्रोमेट अ‍ॅडवायझरी बुलेटीन

## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर

## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १२.१२.२०२५

जिल्हा : सांगली

| मागील आठवड्यातील हवामान (०६.१२.२०२५ ते १२.१२.२०२५) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१३.१२.२०२५ ते १७.१२.२०२५) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | दिनांक | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३१ | ३१ | ३२ | ३२ | ३२ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | ११ | १२ | १३ | १३ | १४ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ० | २ | १ | २ | ३ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६८ | ७१ | ७७ | ७९ | ८१ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ३६ | ३९ | ४३ | ४५ | ४५ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | १० | १० | १२ | ११ | १० |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | पू.ई. | पू.ई. | पू. | पू.ई. | पू. |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सांगली जिल्ह्यामध्ये दिनांक १३ ते १६ डिसेंबर दरम्यान आकाश मुख्यत: स्वच्छ राहण्याची तसेच १७ डिसेंबर रोजी आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. सांगली जिल्ह्यामध्ये १७ डिसेंबर पर्यंत कमाल तापमान ३१.० ते ३२.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे. पुढील ५ दिवसांत किमान तापमान ११ ते १४.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. सकाळची सापेक्ष आद्रता ६८ ते ८१% या दरम्यान तर दुपारची सापेक्ष आद्रता ३६ ते ४५% या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. वाऱ्याचा वेग ताशी १० ते १२ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक १४ ते २० डिसेंबर २०२५ दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी पेक्षा कमी तसेच किमान तापमान सरासरी पेक्षा कमी राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | **थंडीचे प्रमाण वाढल्यामुळे पिकांची पुढीलप्रमाणे काळजी घ्यावी**<br>➢ थंडीपासून पिकाच्या बचावासाठी पिकास सायंकाळी हलके पाणी द्यावे<br>➢ केळीचे गुच्छ सच्छिद्र पॉलिथीन पिशव्याने झाकून ठेवा .<br>➢ उस तोड कामगार यांनी विशेष काळजी घ्यावी. थंडीच्या इशाऱ्या दरम्यान पहाटेच्या वेळी काम करणे शक्यतो टाळावे<br>**शेतकरी बांधवांनी पाणी आणि खते व्यवस्थापनासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी यांनी विकसित केलेल्या खालील मोबाईल अ‍ॅपचा अवश्य वापर करावा**<br>➢ फुले इरिगेशन शेड्युलर (PLS) मोबाईल/वेब अ‍ॅप्लिकेशन: प्रवाही, तुषार व ठिबक सिंचन पद्धतीने वेगवेगळ्या पिकास वेगवेगळा वाढीच्या अवस्थेत पाण्याची गरज तसेच संच चालवण्याचा कालावधी काढण्यासाठी उपयुक्त https://play.google.com/store/apps/details?id=net.parthinfotech.modified_pis<br>➢ फुले र्टिगेशन शेड्यूलर (PFS) मोबाईल अ‍ॅप्लिकेशन : ठिबक सिंचन पद्धतीद्वारे वेगवेगळ्या पिकांस खते किती दयावीत व ते देण्याचा कालावधी काढण्यासाठी उपयुक्त https://play.google.com/store/apps/details?id=com.rkvy.caast.pfs |
| संदेश | | ❖ **१७ डिसेंबर पर्यंत किमान तापमानामध्ये २ ते ३ अंश सेल्सिअसने घट होण्याची शक्यता असल्याने शेतकरी बांधवांनी स्वत:ची व आपल्या पशूधनाची काळजी घ्यावी** |
| गहू | कांडी धरणे | ➢ बागायती वेळेवर पेरणी केलेल्या गहू पिकास २१ दिवस पूर्ण झालेले असल्यास ३ गोणी युरिया प्रती हेक्टर या प्रमाणात द्यावा.<br>➢ मागील आठवड्यामध्ये ढगाळ हवामान राहिल्याने गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून येताच मॅन्कोझेब ७५% डब्ल्यु.पी. ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी याप्रमाणात मिसळून फवारणी करावी. |
| रब्बी ज्वारी | वाढीची | ➢ किमान तापमान १५ अंश सेल्सिअस पेक्षा कमी झालेले असल्यामुळे वाढीच्या अवस्थेत ज्वारी पिकावर मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.<br>➢ या किडीची पिल्ले व प्रौढ पानातील अन्नरस शोषण करतात व आपल्या शरीरातून मधासारखा गोड चिकट पदार्थ बाहेर टाकतात त्यावर काळी बुरशी वाढते (चिकटा रोग) त्यामुळे पिकाच्या अन्न तयार होण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो व परिणामी उत्पादनात घट होते.<br>➢ नियंत्रणासाठी ३० टक्के प्रवाही डायमेथोएट ५०० मी.लि ५०० लिटर पाण्यातून फवारावे.<br>➢ या किडीच्या नियंत्रणासाठी पिवळया रंगाचे चिकट सापळे एकरी ४ या प्रमाणात लावावे तसेच प्रादुर्भाव दिसताच ५% निंबोळी अर्काची फवारणी ५ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात करावी. |
| हरभरा | वाढीची | ➢ घाटे आळीच्या नियंत्रणासाठी पिकास फुलकळी येऊ लागताच ५ टक्के निंबोळी अर्काची पहिली फवारणी करावी. |

**दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६** **ईमेल: adrkolhapur@rediffmail.com**


| | | |
|---|---|---|
| | | ➢ मध्यम जमिनीत २० ते २५ दिवसांनी पहिले, ४५ ते ५० दिवसांनी दुसरे आणि ६५ ते ७० दिवसांनी तिसरे पाणी द्यावे. हरभरा पिकाला सर्वसाधारणपणे २५ सेंमी पाणी लागते. प्रत्येक वेळी पाणी प्रमाणशीर (७ ते ८ सें.मी.) देणे महत्वाचे असते. जास्त पाणी दिले तर पीक उमळण्याचा धोका असतो. स्थानिक परिस्थितीनुसार व जमिनीच्या खोलीनुसार पाण्याच्या दोन पाळयामध्ये अंतर ठेवावे. जमिनीस फार मोठ्या भेगा पडण्याच्या आतच पिकास पाणी द्यावे. पाणी दिल्यानंतर शेतात पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी, अन्यथा मुळकुज या रोगाने पिकाचे नुकसान होते. |
| सूर्यफूल | शाखिय वाढ | ➢ बागायती सूर्यफूल पिकास पेरणीनंतर एक महिन्याच्या आत ३० किलो नत्राची मात्रा प्रती हेक्टरी या प्रमाणात द्यावी |
| ऊस | वाढीची | ➢ डिसेंबर महिन्यामध्ये सरासरी बाष्पीभवनाचा वेग ३.६३ मिमी प्रती दिवस एवढा असतो ऊस पिकास दररोज २.१७ लिटर पाण्याची आवश्यकता असते त्यासाठी ठिबक सिंचन संच (४ लिटरचा ड्रीपर) दररोज ३३ मिनिटे चालवावा. |
| | सुरु ऊस लागवड | ➢ सुरु ऊस लागवड करण्यासाठी को.८६०३२(नीरा), फुले २६५, फुले १०००१, फुले ११०८२, फुले ऊस १५०१२, फुले १३००७, को.९४०१२(फुले सावित्री), को. ९२००५ यापैकी एका वाणाची निवड करावी.<br>**बेणे प्रक्रिया:**<br>➢ लागणीपूर्वी बेणे १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून त्यामध्ये १०-१५ मिनिटे बुडवावे व नंतर ॲसेटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू अनुक्रमे १ किलो व १२५ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून त्यात कांडया ३० मिनीटे बुडवून लगेच लागण करावी. |
| द्राक्ष | काडी वाढीची अवस्था | ➢ तापमान कमी होण्याची शक्यता असल्याने द्राक्ष पिकावर भुरीचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे. प्रादुर्भाव दिसून येताच सल्फर @ २-२.५ ग्रॅम/लीटर वापरावे. जर रोग आधीच दिसून येत असेल तर हेक्साकोनाझोल किंवा डायफेनोकोनाझोलची फवारणी केली जाऊ शकते.<br>➢ जैवनियंत्रण घटकांचा नियमित वापर सुरू ठेवावा. |
| हळद | कंद भरणे | ➢ आद्रतायुक्त हवामानामध्ये पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव होऊ शकतो त्यामुळे प्रादुर्भाव झाल्यास रोग नियंत्रणासाठी कार्बेन्डॅझिम ५० डब्ल्यू.पी. १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावी. फवारणी करताना स्टीकरचा वापर करावा. |
| पशुधन | वाढीची | ➢ रात्री जनावरे गोठ्यात बांधावीत आणि त्यांना थंडीपासून बचावासाठी कोरडी उबदार जागा उपलब्ध करून द्यावी<br>➢ थंडीचा सामना करण्यासाठी व जनावरांना निरोगी ठेवण्यासाठी आहारात पुरेसे प्रथिने आणि खनिजे द्यावीत<br>➢ रात्रीच्या वेळी जनावरे / बकरीना उघड्यावर ठेवू नका.<br>➢ शेळयांना फुफ्फुसचा दाह व घटसर्प या रोगाच्या प्रतिबंधासाठी डिसेंबर महिन्यामध्ये रोग प्रतिकारक लस तज्ञ पशूवैद्यकाच्या सल्ल्याने टोचून द्याव्यात |
| कुक्कुटपालन | वाढीची | ➢ पुढील ५ दिवस किमान तापमान ११ ते १४ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता असल्याने पोल्ट्री पक्ष्यांचे थंडीपासून बचावासाठी पोल्ट्री शेड मधील तापमान रात्रीच्या तसेच पहाटेच्या वेळी उबदार राहील याची काळजी घायवी. |

| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |
|---|---|

स्त्रोत

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई

**ठिकाण : कोल्हापूर**

**दि.** : १२.१२.२०२५

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा**
**सहयोगी संशोधन संचालक,**
**विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर**